# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील खाजगी शिकवण्यावर अंकुश ठेवण्याबाबत

**(१) ३८२०९ (३०-११-०००२). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठिकठिकाणी उघडण्यात आलेल्या व विद्यार्थ्यांची लुबाडणूक करणाऱ्या खाजगी शिकवण्यांवर अंकुश ठेवण्यासाठी नवा कायदा करणार असल्याची घोषणा माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'आमच्या क्लासेस मध्ये प्रवेश घ्या' परीक्षेत १०० टक्के गुण मिळवा', अशा भुल-थापा देणाऱ्या जाहिराती सदरहू कोचिंग क्लासेस करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सी.ई.टी. चा ताण विद्यार्थ्यांवर असल्याने पालक हतबल होऊन मुलांच्या भविष्यासाठी अशा खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये मुलांना प्रवेश घेऊन देतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती उपाययोजना व धोरण आखण्यात आले अथवा भविष्यात प्रस्तावित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील खाजगी शिकवणी वर्गावर नियंत्रणाकरीता अधिनियम तयार करण्यासाठी दिनांक दिनांक ०४.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने मसूदा तयार करुन शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने अधिनियम तयार करण्यासंदर्भातील पुढील कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ लागू करण्याबाबत**

**(२) ६५०१० (१९-०९-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने दिनांक १ एप्रिल २०१० पासून बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ लागू केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शिक्षण मंडळाना या आधी लागू असलेले मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ व अन्य तीन कायदे शासनाने रद्द करुन त्या ठिकाणची शाळा, मंडळे, स्थानिक समित्या विसर्जित करण्यात येवून उक्त समित्यांवरील व मंडळावरील सदस्यांनी आपली पदे रिक्त करावीत व महापालिका नगरपालिकानी नव्याने शिक्षण समिती स्थापन कराव्यात, असा अध्यादेशही दिनांक १ जुलै २०१३ रोजी वा त्या सुमारास काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या बरखास्तीनंतरही राज्यात बऱ्याच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अद्यापही जुन्याच सदस्यांकडून बेकायदेशीररीत्या कामकाज सुरु असल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनानो चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) दिनांक १६.०६.२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अधिनियम, २०१३ अन्वये शाळा मंडळे, स्थानिक समित्या किंवा इतर कोणत्याही समित्या किंवा मंडळे त्यांचा संबंधित पदावधी समाप्त झाल्यानंतर विसर्जित होतील आणि सदस्य आपली पदे रिक्त करतील तसेच, अशी शाळा मंडळे, स्थानिक समित्या किंवा मंडळे ही स्थानिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली काम करतील अशी तरतूद करण्यात आली आहे. ज्या शिक्षण मंडळाचा पदावधी समाप्त झालेला नाही अशी मंडळे पदावधी संपेपर्यंत कार्यरत होती. तथापि, सदर शिक्षण मंडळाचा पदावधी समाप्त झाल्यानंतर संबंधित शिक्षण मंडळे विसर्जित झाली आहेत.

---

**राज्यातील अन्न व औषध विभागातील कर्मचारी-अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३) ७७९९३ (२०-०४-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्न व औषध विभागातील कर्मचारी-अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागात १ हजार १७६ पदे मंजूर असून त्यातील केवळ ८११ पदांची भरती करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार ४० हजार लोकसंख्येच्या मागे एक अन्न निरीक्षक आणि औषध निरीक्षक असणे आवश्यक आहे. परंतु राज्यात १ लाख ३५ हजार लोकसंख्येच्या मागे फक्त एक अन्न निरीक्षक आणि औषध निरीक्षक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-०९-२०१८) :** (१) व (२) सद्यस्थीतीत अन्न व औषध प्रशासनात एकूण ११६७ पदे मंजूर असून त्या पदांपैकी ८३७ पदे भरलेली असून ३३० पदे रिक्त आहेत.
(३) सद्यस्थितीत अन्न व औषध प्रशासनात औषध निरीक्षक संवर्गात १६१ पदे व अन्न सुरक्षा अधिकारी संवर्गात २६५ पदे मंजूर आहेत. राज्याच्या लोकसंखेचा विचार करता, राज्यात अंदाजे ७ लाख लोकसंख्येमागे १ औषध निरीक्षक व सुमारे ४.२५ लाख लोकसंख्येमागे १ अन्न सुरक्षा अधिकारी कार्यरत आहे.
(४) अन्न व औषध प्रशासनातील अन्न, औषध, प्रयोगशाळा व अन्य विभागांकरिता मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी १९१२ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वैजापूर व पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यात स्वच्छ भारत मिशनअंतर्गत शौचालय बांधणीचे उद्दीष्ट अपूर्ण असल्याबाबत

**(४) ९०५२७ (२१-०८-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात स्वच्छ भारत मिशनअंतर्गत एकूण १३४ ग्रामंपचायत क्षेत्रात एकूण ४८ हजार कुटुंबासाठी शौचालय बांधणीचे उद्दीष्ट असतांना केवळ २८ हजार कुटुंबानी शौचालय बांधले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या सात हजार कुटुंबाचे शौचालय बांधणीचे प्रोत्साहनपर अनुदानाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पैठण तालुक्यात स्वच्छ भारत मिशनअंतर्गत १०६ ग्राम पंचायतीच्या अंतर्गत दिनांक १ एप्रिल ते २ ऑक्टोबर २०१७ पर्यंत २६०१२ वैयक्तिक शौचालय बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते त्यापैकी ९२१५ शौचालयाचे काम सुरु झाले व त्यापैकी ७११६ शौचालयाचे काम पूर्ण झाले परंतु लाभार्थ्यांचे रूपये ११ कोटी ५ लाख ८० हजार शासनाकडे प्रलंबित असून ते न मिळाल्यामुळे स्वच्छ भारत मिशनचे उर्वरित काम बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (३) मधील १०६ पैकी ३५ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या असून उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०९-२०१८) :** (१) होय.

वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १३४ ग्राम पंचायत असून पायाभूत सर्वेक्षणानुसार ४५७८५ कुटुंबांपैकी जुन २०१७ अखेर ३०९९३ कुटुंबांनी शौचालय बांधकाम पूर्ण केले होते.
(२) होय.
(३) व (४) हे खरे नाही.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पैठण तालुक्यासाठी रु.८०३.९८लक्ष इतका निधी औरंगाबाद जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात आलेला आहे. पैठण तालुक्यात एकूण २७७१५ वैयक्तिक शौचालय बांधण्याचे उद्दिष्ट होते. सदर उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले असून त्यापैकी १९९६३ लाभार्थ्यांचे वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रोत्साहनपर अनुदानाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यासाठी रु.२३९५.५६लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे.तथापि निधीअभावी स्वच्छ भारत मिशनचे काम बंद झालेले नाही.
(५) वैजापूर व पैठण तालुक्यासह औरंगाबाद जिल्हा दिनांक ११/३/२०१८ रोजी हागणदारीमुक्त घोषित करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या दिनांक २५/७/२०१८ च्या मंजूरी आदेशांन्वये स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत एकूण रु.१३५२९२.१९ लक्ष इतका निधी प्राप्त झाला असून औरंगाबाद जिल्हा परिषदेला आवश्यक निधी वितरीत करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खासगी शिकवणी वर्गावर नियंत्रण आणण्याकरिता अधिनियम करण्याबाबत**

**(५) १०५२४९ (०६-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय**

**भरणे (इंदापूर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पहिलीपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंत खाजगी क्लास मोठ्या प्रमाणात चालविले जात असून या क्लासेसवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने बहुतांश क्लासचालकांकडून विद्यार्थी, पालकांची पिळवणुक केली जात असल्याने शिक्षण तज्ञ, लोकप्रतिनिधींनी खासगी क्लाससाठी सर्वंकष कायदा तयार करण्याची मागणी शासनाकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात खासगी कोचिंग क्लासेसवर नियंत्रण आणण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने खासगी शिकवणीवर अधिनियम पारित केला असून सदर अधिनियमांतर्गत आतापर्यंत किती खाजगी कोचिंग क्लासेसवर बंदी घालण्यात आली आहे,

(३) तसेच खासगी क्लासच्या माध्यमातून विद्यार्थी-पालकांची होत असलेली लूट थांबविण्यासाठी व त्यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठी राज्य शासनाने राज्याचे शिक्षण आयुक्त डॉ.विपिन शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली १२ सदस्यांची समिती नेमली असनू उक्त समितीद्वारे राज्यात खासगी शिकवणी नियंत्रण अधिनियम २०१८ नुसार खाजगी शिक्षकवणी, कोचिंग क्लासेसचे शुल्क निश्चित करण्यात येणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समितीच्या आजतागायत किती बैठका झाल्या आहेत तसेच सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, खासगी कोचिंग क्लासेस बंद पडल्याने शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर अश्या उच्चसुशिक्षित व्यक्तींच्या रोजगारावर परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील खाजगी शिकवणी वर्गांवर नियंत्रणाकरीता अधिनियम तयार करण्याच्या अनुषंगाने विधेयकाचा मसूदा तयार करण्यासाठी दिनांक ०४.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने मसूदा तयार करुन शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने अधिनियम तयार करण्यासंदर्भातील पुढील कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयातील अप्सरा टॉकीजजवळील शासकीय विहीरीचा खाजगी इसमाने ताबा घेतल्याने निर्माण झालेली तीव्र पाणी टंचाई

**(६) १०६५३६ (१९-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील अप्सरा टॉकीज मार्गावरील स्थानिक नागरिक श्री.भास्कर जोशी यांच्या घराला लागून शीट क्रमांक ४८ मधील प्लॉट क्रमांक ७७ या शासकीय भूखंडावर असलेल्या विहिरीमधून तेथील नागरिक पाण्याचा वापर करित असून उक्त शासकीय विहिरीवर खाजगी इसमाने कब्जा करून शेड बांधल्याने नागरिकांची पाण्याची गैरसोय व दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार जमिनीवरील शासकीय पाण्याचे स्त्रोत पाणी टंचाई काळात वापरण्याकरिता मज्जाव करणा-या संबंधित कब्जेदार व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अप्सरा टॉकीज मार्गावर यवतमाळ मध्ये राहणारे नागरिक श्री.भास्कर जोशी यांच्या घराला लागून शीट क्रमांक ४८-ए मधील प्लॉट क्रमांक ७७ च्या नझूल नकाशावर विहीर असल्याची नोंद आहे.

याबाबत चौकशी केली असता असे आढळून आले आहे की, या ठिकाणी १२ ते १५ वर्षापूर्वी निरुपयोगी विहीर अस्तित्वात होती. तथापि तेथील लोक या विहीरीचा कचराकुंडी म्हणून वापर करत होते.

सदरची जागा उपविभागीय अधिकारी तथा नझुल अधिकारी, यवतमाळ यांनी अस्थायी पट्टयावर व्यावसायिक प्रयोजनाकरिता श्री. विकास नंदलाल सरशेंडे यांना दिली आहे. त्यांनी त्या ठिकाणी शेड उभारून दुकानासाठी वापर सुरु केला असल्याने याप्रकरणी त्यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच या कारणामुळे विहीरी अभावी तेथील नागरिकांची अडचण होऊन पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे, हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर सह राज्यातील अनुदानित व विना अनुदानित माध्यमिक शाळांमधील नैसर्गिक वाढीच्या अतिरिक्त तुकड्यांचे मंजुरीबाबत

**(७) १०९२६३ (०६-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सह राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित व विना अनुदानित माध्यमिक शाळांमधील अनुदान पात्र असलेल्या नैसर्गिक वाढीच्या अतिरिक्त तुकड्यांचे मंजुरीचे एकूण किती प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत,
(२) तसेच ज्या शाळांमधील नैसर्गिक वाढीच्या अतिरिक्त तुकड्यांचे ऑनलाईन मूल्यांकन होऊ शकले नाही अशा अतिरिक्त तुकड्यांचे ऑफलाईन मूल्यांकन करून अनुदान मंजुरीबाबतचे एकूण किती प्रस्ताव शासनाकडे आलेले आहेत,
(३) तसेच नागपूर विभागातील जिल्हावार असे एकूण किती प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी विचाराधीन आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली अहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१८) :** (१) व (२) नागपूर सह राज्यातील ऑनलाईन व ऑफलाईन मुल्यांकन करुन २६८ शाळांचे वर्ग/ तुकडयांचे प्रस्ताव अनुदानास पात्र घोषित करण्यासाठी शासनाकडे प्राप्त झाले आहेत.
(३) नागपूर विभागातील गडचिरोली-४, चंद्रपूर-३ व वर्धा-२ असे एकूण ९ शाळांचे व नागपूर-१, गोंदिया-२, गडचिरोली-२ असे एकूण ५ शाळांच्या वर्ग तुकडयांचे प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी प्राप्त झाले आहेत.
(४) या बाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील लाभार्थ्यांना शिधापत्रिका उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(८) १११२०३ (२४-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील अनेक लाभार्थी कुटुंबाकडील शिधापत्रिका स्वस्त धान्य दुकानदार यांनी तहसील प्रश्नासनाच्या कामासाठी जमा करुन घेतल्याने सदर लाभार्थी कुटुंबाकडे शिधापत्रिकाच नसल्याने धान्य मिळत नसल्याचे तसेच इतर शासकीय योजनांच्या कामासाठी गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिधा पत्रिका संबंधित कुटुंबांना वाटप करण्याबाबत तसेच शिधा पत्रिका नसलेल्या कुटुंबाना शिधा पत्रिका वाटपाची मोहीम राबविण्याबाबत व सदर लाभार्थ्यांची शिधा पत्रिके अभावी होत असलेली गैरसोय दूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, लातूर ग्रामीण यांनी उपविभागीय अधिकारी रेणापूर व तहसीलदार, रेणापूर (जि.लातूर) यांना नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान रेणापूर तहसील कार्यालयात झालेल्या तालुका आढावा बैठकीत सूचना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कुंभारी (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील स्वस्त धान्य परवानाधाराकास मागणी करूनही नियतनाप्रमाणे तहसीलदार, रेणापूर यांनी धान्य मंजूर न केल्याने या गावातील लाभार्थ्यास सदर कालावधीतील धान्य वाटप झाले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, रेणापूर तालुक्यातील किती लाभार्थी कुटुंबाकडे शिधा पत्रिका उपलब्ध नाहीत व उक्त लाभार्थी कुटुंबाना शिधापत्रिका वितरीत करण्याबाबत किती कालावधी लागेल,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त ठिकाणी शिधापत्रिका व धान्य वाटपाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१०-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

शिधापत्रिका संबंधित कुटुंबांना वाटप करण्याबाबत तसेच शिधापत्रिका नसलेल्या कुटुंबांना शिधापत्रिका वाटपाची मोहिम राबविण्याबाबत व सदर लाभार्थ्यांची शिधापत्रिके अभावी होत असलेली गैरसोय दूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी लातूर ग्रामीण यांनी उपविभागीय अधिकारी रेणापूर व तहसिलदार रेणापूर जि. लातूर यांना नोव्हेंबर २०१७ वा या दरम्यान रेणापूर तहसिल कार्यालयात झालेल्या तालुका आढावा बैठकीत सूचना दिलेल्या आहेत.
(३) मौ.कुंभारी, ता.रेणापूर येथे एकूण १५२ शिधापत्रिकाधारक असून त्यामध्ये ६६२ सदस्य आहेत. यापैकी ५ अंत्योदय व ३७ अन्नसुरक्षा शिधापत्रिकेच्या लाभार्थ्यांकडून धान्य उचलण्यात येते व अंत्योदय योजनेच्या १५ व अन्नसुरक्षा योजनेच्या ३७ शिधापत्रिका धारकांकडून अन्नधान्याची उचल करण्यात येत नाही.
(४) अर्जदाराच्या मागणीनुसार विहित शुल्क व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर विहीत कालावधीत शिधापत्रिका वितरीत करण्यात येते.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक संघटनेच्या विविध मागण्यांबाबत**

**(९) ११२३५० (०६-०४-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील मूल्यांकन प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांना तातडीने अनुदान देण्यात यावे या मागणीसाठी लातूर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक संघटनेने दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आंदोलनकर्त्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करावी इत्यादीमागण्या शासनाकडे केल्या आहेत, ही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त मागणी संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) "कायम विनाअनुदान" तत्वावर परवानगी दिलेल्या व कायम शब्द वगळलेल्या १२३ उच्च माध्यमिक शाळा व २३ उच्च माध्यमिक शाळांच्या अतिरिक्त शाखा व तुकडयांना शासन निर्णय, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ अन्वये विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आले आहे.

शासन निर्णय, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१० अन्वये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर रुजू झालेल्या व १०० टक्के अनुदानित शाळांतील कर्मचा-यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विनाअनुदानीत शाळांची अनुदाने मंजूर करण्याबाबत**

**(१०) ११३३०८ (०६-०४-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिकच्या प्रत्येकी सुमारे २ हजार विना अनुदानित शाळा असुन यापैकी २४१ प्राथमिक, ५८ माध्यमिक शाळांना १०० टक्के तर १ हजार ६८० शाळांना केवळ २० टक्के अनुदान मिळत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुदानापासून वंचित असलेल्या या सर्व शाळाही ८० ते १०० टक्के अनुदानासाठी पात्र असून शासनाने जुलै-२०१६ मध्ये अनुदानास पात्र शाळांची यादीही घोषित केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने अद्यापही अनुदानासाठी निधी मंजूर केलेला नसल्याने अनुदानाअभावी गत १७ वर्षापासून या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मच्याऱ्यांना अल्प वेतनावर काम करावे लागत असल्याने या विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांनी ६ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास अनवाणी विद्यादानाचे काम करुन शासनाच्या धोरणाचा जाहीर निषेध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त शळांना अनुदान वितरीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१८) :** (१) कायम विना अनुदान मान्यता दिलेल्या व दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी वेळोवेळी अनुदानासस पात्र घोषित केलेल्या १६२८ शाळा व २४५२ तुकडयांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांना विहित अटी व शर्तीच्या अधीन राहुन सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय, शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये घेण्यात आला आहे.

(२) शासन निर्णय, दिनांक १ व २ जुलै, २०१६ अन्वये १५८ प्राथमिक शाळा व ५०४ तुकडया तसेच ६३१ माध्यमिक शाळा व १६०५ वर्ग तुकडयांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आले आहे.

(३) शासन निर्णय, दिनांक १ व २ जुलै, २०१६ अन्वये अनुदानास पात्र घोषित केलेल्या शाळांपैकी ५१ माध्यमिक शाळा व १९ माध्यमिक शाळांच्या ५४ तुकडयांवरील ३७३ शिक्षक व १७८ शिक्षकेत्तर पदांबाबत तपासणी करण्यात येत असून उर्वरीत शाळा व तुकडयांना शासन निर्णय, दिनांक ९ मे, २०१८ अन्वये २० टक्के प्रमाणे अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(४) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील नियम ४ (३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कवठेपिरान (ता.मिरज, जि.सांगली) येथील कै.पै.हिंदकेसरी मारुती माने यांचे स्मारक बांधण्याबाबत घेतलेला निर्णय

**(११) ११४३१८ (१८-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवठेपिरान (ता.मिरज, जि.सांगली) येथे कै.पै.हिंदकेसरी मारुती माने स्मारक बांधण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारक किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या स्मारकाला आतापर्यंत किती खर्च आला आहे,

(४) असल्यास, स्मारकाच्या बांधकामाबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर स्मारकाचे काम दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित असून आतापर्यंत रु.१०७.०० लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.

(४) कै.पै.हिंदकेसरी मारुती माने स्मारक बांधकामासाठी शासनाने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रु.१०७.०० लक्ष व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.२०४.०० लक्ष असा एकूण ३११.००

लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. सद्य:स्थितीमध्ये स्मारकाचे आर.सी.सी. आणि विट बांधकाम, आतिल व बाहेरील बाजूकडील गिलावा पुर्ण झाला असून छताचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी नगरपरिषदांमधील सफाई कामगारांच्या अनेक समस्या व प्रलंबित मागण्यांबाबत**

**(१२) ११४६९७ (१४-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी नगरपरिषदांमधील सफाई कामगारांच्या अनेक समस्या व प्रलंबित मागण्यांसदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.राज्यमंत्री नगरविकास यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सफाई कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसदर्भात निर्णय घेण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार रत्नागिरी नगरपरिषदांमधील सफाई कामगारांच्या अनेक समस्या व प्रलंबित मागण्यांसदर्भात शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१), (२) व (३) अशा आशयाचे पत्र स्थानिक लोक प्रतिनिधींकडून प्राप्त झाले, हे खरे आहे.
• स्थानिक लोक प्रतिनिधी यांच्या मागणीनुसार यासंदर्भात दि.१४/१२/२०१७ रोजी बैठक पार पडली असून बैठकीत घेतलेल्या निर्णयाचे इतिवृत्त संबंधितांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांच्या एकभाषिक पुरक वाचन पुस्तक योजनेअंतर्गत देशाचे पंतप्रधान यांच्यावरील पुस्तक प्रकाशित करण्यात येणार असल्याबाबत**

**(१३) ११५४९८ (०६-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात इयत्ता चौथीच्या विदयार्थ्यांसाठी महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांच्यामार्फत एकभाषिक पुरक वाचन पुस्तक योजनेअंतर्गत महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले या प्रमाणे देशाचे सध्याचे पंतप्रधान यांच्यावरील पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर महापुरुषांच्या पुस्तक खरेदी पेक्षा देशाचे पंतप्रधान यांचे पुस्तक दुप्पटीपेक्षा जास्त दराने खरेदी करण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या पुस्तक खरेदीत एवढी तफावत असण्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शिक्षण विभागातील माहिती (डेटा) देणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) ११६५९६ (२०-०७-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५०० विनाअनुदानित खाजगी शाळांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शैक्षणिक संस्था महासंघ (एफएसएम) ने शिक्षण विभागातून शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या आधारची माहिती राजकीय पक्षांना पुरविली जात असल्याचा आरोप माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केला आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील शाळांना सरल च्या (सिस्टमॅटिक ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रिफॉर्म फॉर आचिव्हमेंट ऑफ लर्निंग बाय स्टुडंट) अंतर्गत शाळेशी संबंधित विविध माहिती ऑनलाईन भरावयाची असून यात शाळा व्यवस्थापक, शिक्षक, विद्यार्थी यांच्या आधार कार्डाचीही माहिती घेतली जात असल्यामुळे मोबाईल क्रमांक, पत्ता ही माहिती देखील मिळत असल्याने, तसेच सरलच्या माध्यमातून माहिती अपलोड होत असून राजकीय पक्षासाठी ही माहिती अतिशय उपयुक्त असल्याने शिक्षण विभागातून ही माहिती देण्यात आल्याचा आरोप शैक्षणिक संस्था महासंघाने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील काही शहरामधील पालक व शिक्षकांना सध्याच्या सरकारबद्दल मत जाणून घेण्यासाठी राजकीय पक्षाकडून फोन आल्याने शिक्षण विभागाच्या कार्यप्रणालीवर संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार राजकीय पक्षांना माहिती पुरविणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वानिवडे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) गावासाठी लघुनळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत**

**(१५) ११६६७७ (२५-०७-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वानिवडे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) गावासाठी लघुनळ पाणीपुरवठा योजना नव्याने लागू करण्याबाबत सदर ग्रामपंचायतीने दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या ग्रामसभेत ठराव पारित करून दिनांक २४ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.पाणीपुरवठा मंत्री, उप अभियंता, जिल्हापरिषद उपविभाग, देवगड कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा व जिल्हापरिषद सिंधुदुर्ग यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर योजना नव्याने विनाविलंब कार्यान्वित करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) वानिवडे गावासाठी बापार्डे खैराटवाडी येथील उद्भव विहिरीवरुन नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबतची मागणी ग्रामपंचायतीचा ग्रामसभा ठराव क्र.६(१), दिनांक १०.१२.२०१६ अन्वये करण्यात आली होती. त्यानुसार पाणी टंचाई कार्यक्रम सन २०१६-१७ अंतर्गत नळ योजना विशेष दुरुस्ती करणे हे काम प्रस्तावित करण्यात आले होते. परंतु ग्रामपंचायतीने दिनांक २२.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये वानिवडे गावात पाणी पुरवठा मुबलक असून सद्य:स्थितीत पाणी टंचाई नाही असे कळविले. त्यामुळे योजनेबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

सद्य:स्थितीत वानिवडे गावामध्ये भटवाडी येथे १ विंधन विहीर कार्यान्वित असून मांगरवाडीसाठी १ दुहेरी पंप योजना कार्यान्वित आहे. तसेच सरवणकरवाडी व बंदरवाडी येथील खाजगी विहिरीवरुन तेथील ग्रामस्थांना पाणी पुरवठा होतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना २० टक्के अनुदान देण्याबाबत**

**(१६) ११७००६ (२०-०७-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने माहे जुलै, २०१६ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या विनाअनुदान व कायम अनुदानीत तत्वावरील मान्यताप्राप्त खासगी प्राथमिक व माध्यमिक किती शाळांना सरसकट २० टक्क्याप्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे,

(२) असल्यास, शासनाने या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदासाठी माहे एप्रिल, २०१८ ते माहे मार्च, २०१९ या १२ महिन्यासाठी ६४ कोटी ९८ लाखाच्या अनुदानास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेचअंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१८) :** (१) व (२) होय, मंत्रिमंडळाच्या दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजीच्या बैठकीत "कायम विनाअनुदान" तत्वावर परवानगी दिलेल्या व शासन निर्णय, दिनांक १ व २ जुलै, २०१६ अन्वये अनुदानास पात्र घोषित केलेल्या मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा व वर्ग तुकडयांवरील ६७९० शिक्षक व २१८० शिक्षकेतर अशा एकूण ८९७० पदांना पुढील आदेशापर्यंत २० टक्के प्रमाणे अनुदान देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

(३) सदर शाळांना प्रत्यक्ष अनुदान मंजूर करण्यासाठी पावसाळी अधिवेशनामध्ये लाक्षणिक पुरवणी मागणीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. निधी वितरणाबाबत आवश्यक कार्यवाही झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बारवई (ता.पनवेल, जि.रायगड) गावाला नियमित पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(१७) ११७४५९ (२५-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारवई (ता.पनवेल, जि.रायगड) गावाला एमआयडीसी मार्फत होणारा पाणीपुरवठा कमी दाबाने व वारंवार खंडीत होऊन पाणी टंचाई निर्माण होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाला पूर्ण दाबाने व नियमित पाणी पुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) बारवाई (ता.पनवेल, जि.रायगड) नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु.८.०० लक्ष रकमेच्या आराखड्यास व अंदाजपत्रकास माहे, २०१६ मध्ये तांत्रिक मंजूरी देण्यात आली होती. सदर योजनेच्या, गावातील वितरण व्यवस्थेचे व एम. आय. डी. सी. च्या मुख्य जलवाहिनीपासून गावापर्यंतच्या गुरुत्ववाहिनीचे काम पूर्ण करुन बारवई गावास सुरळीत पाणी पुरवठा सुरु केलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात पाणी पुरवठा करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च झाल्याबाबत**

**(१८) ११७६२० (२३-०७-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील शहापूर हा तालुका धरणाचा जिल्हा अशी ओळख असून शहापूर तालुक्यातील धरणातून मुंबई शहराला पाणी पुरवठा होत असूनही तसेच गत पाच वर्षात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी ३ कोटी ४९ लाख रुपये खर्च करण्यात येऊनही सदर तालुक्यात पाणी टंचाई निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच खराडे ग्रामपंचायत हद्दीतील बोंद्रेपाडा गावातील एकमेव विहीर आटल्याने येथील नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत असल्याने गावकऱ्यांनी ग्रामपंचायती विरुध्द ठाणे जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार केली असल्याचे दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(३) असल्यास, शहापूर तालुक्यातील गाव, वाडया तसेच पाडयांना पुरेसे व शुध्द पाणी पुरविण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
शहापूर तालुका डोंगराळ व अतिदुर्गम असल्यामुळे उन्हाळयामध्ये भूगर्भातील पाणी पातळी खालावते आणि माहे मार्च अखेरीस काही ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा सुरु करावा लागतो. मागील ५ वर्षात टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी रु. २.०६ कोटी खर्च झालेला आहे.

(२) हे खरे नाही.
(३) शहापूर तालुक्यातील गावपाडयांना ५ प्रादेशिक योजना ११२ स्वतंत्र नळ पाणी पाणी पुरवठा योजना, ७३२ सध्या विहीरी आणि ५३ विद्युत /सौरपंप योजनेने पाणी पुरवठा केला जात आहे. तालुक्यात २८ पाणी पुरवठा योजना आणि ११ विहीरी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१८-१९ च्या कृती आराखडयात प्रस्तावित आहेत. त्यात खराडे- बोंद्रेपाडा या योजनेचा समावेश आहे.

तसेच तालुक्यातील ९७ टँकरग्रस्त गावपाडयांसाठी "भावली" धरण उद्भव घेऊन गुरुत्वाकर्षणावर आधारित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना "ग्रीड" प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनकार्याचा समावेश करण्याबाबत**

**(१९) ११७७७८ (२३-०७-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात हिंदुहृद्‌यसम्राट, शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनकार्याचा समवेश करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.शालेय शिक्षण मंत्री याच्याकडे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनात केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने मा.शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवन कार्याचा समावेश राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा आली वा येत आहे;
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०९-२०१८) :** (१) होय.
(२) याबाबतचा आशय नवीन अभ्यासक्रमात व पाठयपुस्तकात समावेश करण्याबाबत विषय अभ्यासक्रम व पाठयपुस्तक निर्मिती समिती समोर प्रस्ताव ठेवण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठातील अस्थायी कामगारांच्या मागण्यांबाबत**

**(२०) ११७८६२ (२३-०७-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या कामगार संघटनेने ऐन परिक्षेच्या काळात अतिरिक्त काम न करण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०१८ च्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अस्थायी कामागारांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने काही निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अस्थायी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे:- पगारवाढ, रजा, विद्यापीठाचे ओळखपत्र देणे, वेतन पावती, उत्सव अग्रीम, बायोमॅट्रिक उपस्थिती, सुरक्षा रक्षकांचे गणवेश तसेच सेवेत कायम करावे व समान काम समान वेतन देण्यात यावे.
(३) यासंदर्भात विद्यापीठाने गठीत केलेल्या समितीने आपला अहवाल विद्यापीठास सादर केला असून सदर अहवालास विद्यापीठ व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा क्रिडा कार्यालयातील (जि.बीड) व्यायाम शाळेसाठीचे मंजूर अनुदान बँक खात्यावर टाकण्यासाठी लाच घेतल्याबाबत**

**(२१) ११७८७६ (२०-०७-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा क्रिडा कार्यालयातील (जि.बीड) श्री.नंदा खुरपुडे जिल्हा क्रीडा अधिकारी व शिपाई शेख फईमोद्दीन यास जिल्हा क्रीडा कार्यालयात व्यायामशाळेसाठी मंजूर झालेले तीन लाख रुपयांचे अनुदान बँक खात्यावर टाकण्यासाठी ८० हजार रुपयांची लाच घेताना दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास पकडल्याचे निदर्शास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०८-२०१८) :** (१) होय.
(२) श्रीमती नंदा खुरपुडे, जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांना दिनांक १०.०४.२०१८ च्या शासन आदेश क्रमांक -३६१८/प्र.क्र.५०/क्रीयुसे-२ अन्वये निलंबित करण्यात आले आहे व दिनांक ०९.०५.२०१८ च्या पत्रान्वये फईमोनुद्दीन अलाउद्दीन शेख यांची सेवा समाप्त करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक विभागातील सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदान देण्याबाबत**

**(२२) ११८४१९ (२०-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाची आकडेवारी पाहता केवळ १५८७ ग्रंथालयांना अनुदान मिळत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) तसेच शासनाने यावर्षीच्या अर्थसंकल्पात ग्रंथालयाच्या आर्थिक समस्यांबाबत कोणतीही तरतूद न करता आहे त्या अनुदानातच ५० टक्के कपात केल्यामुळे या ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच शासनाने ग्रंथालयाचा दर्जाबदल, नवीन ग्रंथालयाना मान्यता इ.बाबी थांबविल्यामुळे गाव तेथे ग्रंथालय ही योजना असफल ठरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ग्रंथालयाच्या अनुदानात वाढ व गाव तेथे ग्रंथालय योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी तसेच उर्वरित ग्रंथालयांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

दि. ३१ मार्च, २०१८ अखेर नाशिक विभागातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या १५८७ इतकी आहे. सदर ग्रंथालयांना महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहायक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम, १९७० मधील तरतुदीनुसार अनुदान प्रदान करण्यात येते.
(२) हे खरे नाही.

सन २०१८-१९ या चालु आर्थिक वर्षात शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी २२०५ ०२९८ या लेखाशिर्षांतर्गत रु.१२५,००,००,०००/- (रुपये एकशे पंचविस कोटी) आणि शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी २२०५ ११९६ या लेखाशिर्षांतर्गत रु.२,०९,८८,०००/- (रुपये दोन कोटी नऊ लाख अठ्याऐंशी हजार) इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.
(३) गाव तेथे ग्रंथालय ही योजना नाही. दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेर राज्यात सद्यस्थितीत १२,१४८ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत.

मा.मंत्रीमंडळाच्या बैठकित झालेल्या निर्णयानुसार शासन निर्णय दि. २२.०३.२०१३ व दि. ०७.०६.२०१४ अन्वये मंत्रीमंडळाचे पुढील आदेश होईपर्यंत दर्जावाढ करु नये व यापुढे नवीन ग्रंथालयांना मान्यता देवू नये असा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुदानित संस्थेतील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(२३) ११८७५५ (२०-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत**

**(नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व कर्मचा-यांना सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळत असताना केवळ अनुदानित संस्थेतील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना मात्र या लाभापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शिक्षकेत्तर कर्मचा-यांना आश्वासित सेवाअंतर्गत प्रगती योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील कायम विना अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांचा कायमशब्द काढल्यानंतरही या शाळा, वर्ग/तुकडयांची अनुदानाची पात्रता यादी घोषित केली नसल्याबाबत

**(२४) ११८७६३ (२३-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विना अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांचा कायम शब्द काढल्यानंतर अनेकदा मुल्यांकन होऊन देखील या शाळा, वर्ग व तुकडयांची अनुदानास पात्र यादी घोषित केली गेलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त शाळा/तुकडयाना पात्र घोषित करुन अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१८) :** (१) व (२) “कायम विनाअनुदान” तत्वावर परवानगी दिलेल्या व कायम शब्द वगळलेल्या १२३ उच्च माध्यमिक शाळा व २३ उच्च माध्यमिक शाळांच्या अतिरिक्त शाखा व तुकडयांना शासन निर्णय, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ अन्वये विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आले आहे.

उर्वरीत उच्च माध्यमिक शाळा, अतिरिक्त शाखा व तुकडयांबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सफाळे (जि.पालघर) येथील आदिवासी पाडयांतील पाणी टंचाई दूर करण्याबाबत**

**(२५) ११८९२१ (२३-०७-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सफाळे (जि.पालघर) येथील बहुतांश आदिवासी पाडयांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असून सोनावे व दारशेत या आदिवासी पाडयांतील तीनपैकी दोन विहिरी पूर्णपणे कोरडया पडल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील बहुतांश आदिवासी पाडयातील तसेच दुर्गम भागातील नागरिकांची पाण्याकरिता होणारी गैरसोय दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०८-२०१८) :** (१) पालघर तालुक्यातील मौजे सोनावे व दारशेत येथील आदिवासी पाडयातील पिण्याच्या पाण्याच्या विहीरींची पातळी साधारण माहे मार्च ते जून दरम्यान कमी होते ही वस्तुस्थिती असून दिनांक ०८ मे, २०१८ रोजी दारशेत येथील एक व सोनावे येथील एक विहीरीच्या पाण्याची पातळी खोल गेल्याची बाब खरी असली तरी इतर जवळील विहीरीतून पिण्याचे पाणी ग्रामस्थांना उपलब्ध झालेले आहे.
(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत अंशत: हाताळलेल्या गावे/वाडयांसाठी पेयजल सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र व राज्य हिश्श्यांतर्गत (जिल्हा वार्षिक योजना) निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. यानुसार राज्यातील १७३१० आदिवासी बहुल गावे/वाडयांपैकी दि.३१.०३.२०१८ पर्यंत १५३७२ गावे/वाडयांना शासन निकषानुसार पेयजल सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तथापि केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंशत: हाताळलेल्या गावे/वाडयांसाठी निधीच्या उपलब्धतेनुसार दरवर्षी कृती आराखडा तयार करण्याबाबत जिल्हयांना सूचना देण्यात येत असून सदर कृती आराखडयामध्ये आदिवासी बहुल गावे/वाडयांच्या पाणी पुरवठा योजनांचा देखील समावेश करण्यात येत असतो. यानुसार सन २००९-१० ते सन २०१७-१८ या वर्षातील भौतिक उद्दिष्ट व साध्य खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | वार्षिक उद्दिष्ट | साध्य | साध्य % |
|---|---|---|---|---|
| १ | २००९-१० | २०१४ | १४७२ | ७३.०८% |
| २ | २०१०-११ | १६१६ | १५८५ | ९८.०८% |
| ३ | २०११-१२ | १११५ | ११७७ | १०५.५६% |
| ४ | २०१२-१३ | ९५१ | ७९० | ८३.०७% |
| ५ | २०१३-१४ | ६९३ | ६०५ | ८७.३०% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | २०१४-१५ | ६७६ | ६४२ | ९४.९७% |
| ७ | २०१५-१६ | २२० | १९८ | ९०.००% |
| ८ | २०१६-१७ | २३८ | १८२ | ७६.४७% |
| ९ | २०१७-१८ | ८७ | ६४ | ७३.५६% |

त्याचप्रमाणे सन २०१८-१९ या वर्षाच्या कृती आराखडयाची कार्यवाही सुरु असून सदर कृती आराखडयास राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीच्या बैठकीमध्ये मान्यता घेऊन अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथे क्रिडा संकुल बांधकामाकरीता निधी देण्याबाबत**

**(२६) ११९३४९ (२०-०७-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथे क्रिडा संकुल बांधकामाकरीता २ कोटीचा निधी मिळण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.शिक्षण मंत्री यांना दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रिडा संकुलनासाठी २ कोटी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तालुका क्रीडा संकुल, मालेगांव येथे रु.२.०० कोटीच्या माध्यमातून कोणकोणत्या सुविधा उभारता येतील याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करुन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिनांक २५.०४.२०१८ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना नवीन कुस्ती आखाडा बांधणे, क्रिकेट मैदानावर प्रक्षागृह बांधणे या प्रकल्पासाठी प्रत्येकी रु.१.०० कोटीचे अंदाजपत्रक व आराखडे तांत्रिक मान्यतेसह तालुका क्रीडा संकुल समिती, मालेगांव यांना सादर करण्यास सूचित केले होते. त्यानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगांव यांनी दिनांक १८.०५.२०१८ च्या पत्रान्वये अंदाजपत्रक व आराखडे तांत्रिक मान्यतेसह सादर केले आहेत. सदर अंदाजपत्रक व आराखडे दिनांक ३०.०५.२०१८ च्या पत्रान्वये क्रीडा संचालनालयास प्राप्त झालेले असून आगामी राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीमध्ये प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करुन त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### घाटंजी (जि.यवतमाळ) येथील खाजगी प्राथमिक शिक्षकांना वेतन देण्याबाबत

**(२७) ११९४४२ (२०-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यातील खाजगी प्राथमिक शिक्षकांना प्रशासनाने वेगवेगळी कारणे पुढे करीत आठ महिन्यांपासून वेतनापासून वंचित ठेवल्याचे माहे फेब्रुवारी -मे २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शिक्षकांना गत आठ महिन्यांपासून वेतन न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार उक्त खासगी प्राथमिक शिक्षकांना वेतन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) शालार्थ प्रणालीमध्ये दिनांक १२.१.२०१८ पासून तांत्रिक दोष निर्माण झाला असल्याने दिनांक २३.२.२०१८, २७.२.२०१८ व त्यानंतर दिनांक १८.५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये ऑफलाईन पध्दतीने वेतन अदा करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

---

### घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(२८) ११९७६५ (२५-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यातील ३९ गावांत पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाने ५६ गावांचा पाणी टंचाई निवारणासंदर्भातील आराखडा तयार केला असून त्यासंदर्भात शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आराखड्यास मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०८-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) २०१७-१८ च्या पाणी टंचाई कृती आराखडयानुसार विहीर अधिग्रहण/टँकर या उपाययोजनांसाठी मागणी केलेला रु. ८९.३० लक्ष इतका निधी पंचायत समितीला वितरीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.ढाणकी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नळपाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास मान्यता देणबाबत**

**(२९) १२०९४४ (२३-०७-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.ढाणकी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नळपाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, यवतमाळ यांना दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांनी लेखी पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०९-२०१८) :** (१) व (२) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौ. ढाणकी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव दि.३०.०३.२०१८ रोजी व मुख्य अभियंता, मजीप्रा, अमरावती यांचा पहाणी अहवाल दि.१२.७.२०१८ रोजी शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने विभागाच्या दि.०३.०८.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये काही मुद्यांबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून माहिती मागविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर योजनेस राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूरी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर क्रिडानगरीत क्रिकेटच्या मैदानासह स्पर्धा घेण्यासाठी आवश्यक असणारी खेळपट्टी उपलब्ध नसल्याबाबत**

**(३०) १२०९५१ (२०-०७-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर क्रिडानगरीत क्रिकेटच्या मैदानासह स्पर्धा घेण्यासाठी आवश्यक असणारी खेळपट्टी उपलब्ध नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे स्पर्धा आयोजकांना स्पर्धा बाहेर घ्याव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार कोल्हापूर जिल्हयात क्रिकेट मैदान तयार करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) कोल्हापूर शहरात शिवाजी स्टेडियम येथे क्रिकेट खेळपट्टी उपलब्ध असून सदर ठिकाणी रणजी क्रिकेट, नॅशनल, राज्यस्तर, शालेय स्पर्धाचे आयोजन करण्यात आलेले होते. सद्यस्थितीमध्ये सदर खेळपट्टी ही अति वापर व पाण्याच्या कमतरतेमुळे खराब झालेली आहे. सदर खेळपट्टी दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात आले असून खेळपट्टी वरील गवत सुरक्षित राहणेसाठी लोखंडी बॅरकॅटिंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर खेळपट्टी लवकरात लवकर खेळणे योग्य होईल याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांसाठी वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी विनाअट देण्याबाबत**

**(३१) १२१०१८ (२३-०७-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बसवराज पाटील (औसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकासाठी वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी विनाअट देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईसह राज्यातील पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर अमरावती, नाशिक व लातूर विभागातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी दिनांक २३ ते २७ मे, वरिष्ठ वेतन श्रेणी व दिनांक १ ते १० जून, निवडश्रेणीचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून, ज्या शिक्षकांची १२ वर्षे पूर्ण झाली त्यांना वरिष्ठ व २४ वर्षे पूर्ण झाली त्यांना निवडश्रेणीचे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक असून या प्रशिक्षणाचे आयोजन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वर्षभर विविध कामामध्ये व्यस्त असलेल्या शिक्षकांना मे महिन्यात सुट्टी असूनही वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणी प्रशिक्षणाला उपस्थित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रशिक्षणाला विरोध करीत ज्यूनिअर कॉलेजच्या शिक्षकांना व माध्यमिक शिक्षकांना विनाअट वरिष्ठ व निवडश्रेणी देण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.
(५) विनाअट वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी देण्याची बाब शासनाच्या विचारधीन नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयात पाणी टंचाई निवारणासाठीचा निधी परत गेल्याबाबत**

**(३२) १२१५१५ (२३-०७-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात पाणी टंचाईच्या निवारणासाठी पाणी योजनांवर रुपये ५.६ कोटीचा आराखडा मंजूर करण्यात येऊन या आराखडयातील ५६ योजनांपैकी केवळ ५ कामे सुरु करण्यात आली असून उर्वरित ४.१ २ कोटी रुपयांचा निधी जिल्हा परिषद प्रशासन स्तरावरुन परत गेल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार मंजूर निधी परत जाण्याची कारणे काय आहेत तसेच यास जबाबदार असणा-या अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील गावांचा मुख्यमंत्री पेयजल योजनेमध्ये समावेश करण्याबाबत**

**(३३) १२१६७३ (२३-०७-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद या दुष्काळग्रस्त जिल्हयातील काही गावांचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजनेअंतर्गत करण्याची विनंती लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०९-२०१८) :** (१) होय.
(२) लोकप्रतिनिधींनी मागणी केलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेत समावेश करण्याची बाब तपासण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड व इतर जिल्हयातील धान्य गोदामांची दूरवस्था झाल्याबाबत**

**(३४) १२१९२३ (२३-०७-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात एकूण ५७ शासकीय गोदामांपैकी २७ गोदामे चांगल्या स्थितीत तर ३० गोदामांची दूरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-२०१४ पासून रायगड जिल्यातील १९ गोदामांच्या दुरुस्तीसाठी रुपये २.३५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात कार्यवाही सुरु असल्याचे शासनाने स्पष्ट केले असले तरी रायगड जिल्हा तसेच राज्यातील इतर हजारो गोदामांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) रायगड जिल्हयात एकूण ५७ शासकीय गोदामे आहेत. सदर गोदामांपैकी २७ गोदामे चांगल्या स्थितीत असून ३० गोदामे नादुरुस्त आहेत. सन २०१३-१४ पासून रायगड जिल्हयातील गोदाम दुरुस्ती अंदाजपत्रकांना रु.३.५४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात गोदाम दुरुस्ती कामासाठी रु.२.२१ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

**नागपूर विभागात अनिवासी क्रिडा प्रबोधनी सुरु करण्याबाबत**

**(३५) १२२०८४ (२०-०७-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण व सोयी सुविधा मिळण्याकरीता प्रत्येक जिल्हयात अनिवासी क्रिडा प्रबोधनी सुरू करण्याचा निर्णय घेवूनही विदर्भात नागपूर विभागात अनिवासी क्रिडा प्रबोधनी सुरू करण्यात आली नसल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर अनिवासी क्रिडा प्रबोधनी सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) नागपूर येथे सद्य:स्थितीत ॲथलेटिक्स व हँडबॉल या खेळासाठी निवासी क्रीडा प्रबोधिनी सुरु आहे. या खेळाकरीता अनिवासी क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रवेशाकरीता मागणी नाही. तथापि, विभागीय क्रीडा संकूल, नागपूर येथे बॅडमिंटन या खेळासाठी अनिवासी क्रीडा प्रबोधिनी सुरु होण्यास विनंती केली होती. त्यास दिनांक २० जून, २०१८ च्या पत्रान्वये शासन मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर महानगरपालिका (जि.ठाणे)परिसरातील गोदामांची झालेली दुरवस्था**

**(३६) १२२०८९ (२३-०७-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर महानगरपालिका परिसरात अन्नधान्य साठवण्यासाठी ६० वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या तीन गोदामांच्या परिसरातील अतिक्रमणामुळे गोदामांच्या इमारती कोसळण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिधावाटप कार्यालयाशी संलग्न असलेल्या “भारत खाद्य निगम” विभागाचा सदर गोदामांच्या जागेवर नवीन गोदाम बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांच्या कार्यालयाच्या अखत्यारित उल्हासनगर येथे एकूण ३ ठिकाणी एकूण ६ शेड आहेत. उल्हासनगर येथील तीनही शासकीय गोदामे वापर व वावर करण्यास योग्य नसल्याचे फलक लावण्यात आल्याचे उपविभागीय अभियंता, उल्हासनगर, (सार्वजनिक बांधकाम) उपविभाग, उल्हासनगर यांनी दि.१९.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच उल्हासनगर येथील शासकीय गोदामांच्या आवारात अतिक्रमणे आढळून येत नाहीत.

उल्हासनगर येथील या विभागांतर्गत नवीन गोदाम बांधकाम अंदाजपत्रकाबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

**पुणे जिल्हयात इयत्ता पहिली व आठवींची पुस्तके उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३७) १२२४३७ (२३-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयामध्ये शाळा सुरु होण्यास थोडाच कालावधी असतानाही इयत्ता पहिली व आठवींची नवी पुस्तके उपलब्ध झाली नसल्याचे दिनांक २५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर पुस्तके सर्व शिक्षा अभियान योजनेमार्फत शाळांमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत व बाजारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापुर जिल्हयात पूर्णवेळ जिल्हा पुरवठा अधिकारी नियुक्त करण्याबाबत**

**(३८) १२२५२९ (२३-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापुर जिल्हयात अन्यधान्य पुरवठा वितरण प्रणालीला पुर्णवेळ आधिकारी नसल्यामुळे शिधापत्रिका धारकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात पूर्णवेळ जिल्हा पुरवठा आधिकाऱ्यांची नियुक्ती होणेबाबत नागरिकांनी अनेकदा मागणी केली असुनही शासनाने अद्‌याप अधिकाऱ्यांची ची नियुक्ती केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२७-०८-२०१८) :** (१) नाही.
महसूल व वन विभागाच्या दिनांक ०८.०६.२०१८ च्या आदेशान्वये श्री.रामचंद्र उगले यांची जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर या पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. ते दिनांक २१.०६.२०१८ पासून सदर पदावर हजर झालेले आहेत.
(२) नाही.
(३) नाही.
(४) नाही.

---

## मुंबईसह राज्यातील विधी शाखेच्या "एलएलबी" अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केल्याबाबत

**(३९) १२२६४६ (२३-०७-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील विधी शाखेच्या तीन वर्षाच्या व पाच वर्षाच्या "एलएलबी" अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या व गत आठ महिने त्याचे शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अचानक रद्द करण्याचा निर्णय शिक्षण संचालनालय आणि राज्य सीईटी सेलने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे राज्यातील अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास, हा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०९-२०१८) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) नियम, २०१५ मधील तरतूदीनुसार, केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्यांच्या पडताळणीच्या वेळी, काही विद्यार्थी विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करीत नसल्याचे निदर्शनास आले. जे विद्यार्थी प्रवेशासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करीत नव्हते त्यांच्या नावासमोर अपात्र असल्याचा शेरा देण्यात आला होता. सदर शेऱ्याच्या आधारे काही महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले होते.

या विरुध्द मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेले अंतरिम आदेश व शासनास प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने विधी शिक्षण सल्लागार समितीने केलेली शिफारस विचारात घेऊन, मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकांमधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून, तसेच भारतीय विधिज्ञ परिषद, नवी दिल्ली यांच्या अभिप्रायाच्या अधीन राहून संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरु ठेवण्याबाबत उच्च शिक्षण संचालनालयास सूचना देण्यात आल्या. त्यानुसार उच्च शिक्षण संचालनालयाने राज्यातील सर्व विधी महाविद्यालयांना उचित निर्देश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात रेशनकार्ड आधारसिडींगच्या कामात होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४०) १२२७९९ (२३-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रेशन धान्य वितरणातील काळाबाजार संपवण्यासाठी पुरवठा विभागाकडून आधार कार्डच्या माध्यमातून बायोमेट्रिक पध्दतीने ई-पॉस मशिनव्दारे धान्याचे वितरण केले जात असतांना रेशनकार्ड आणि आधारकार्डची एकत्रित जोडणी करताना रेशनकार्ड एकाचे तर आधार नंबर दुसऱ्याचे जोडण्यात येऊन आधार सिडींगच्या कामात गैरव्यवहार होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरवठा विभागाने यापूर्वीच नेमलेल्या ठेकेदाराने ३८ टक्के म्हणजे अर्धवट काम केले असतानाही त्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याऐवजी कामाची देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आधार सिडींगकरिता शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले असतांनाही धान्य वितरण कार्यालयातून सदर कामासाठी मोबदला घेण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट (०४-०९-२०१८) :** (१) राज्यातील शिधापत्रिकांच्या डाटाबेसमध्ये आधार नोंदणी क्रमांक, बँक खाते क्रमांक, बँक आयएफसी कोड व मोबाईल क्रमांकाचे सिडींग करण्याचे काम सन २०१५ पासुन सुरु करण्यात आले आहे. AePDS वितरण प्रणाली सुरु केल्यानंतर काही आधार क्रमांक चुकीच्या शिधापालिकेला जोडले असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र ही बाब अपवादात्मक आहे, यासाठी वेळीच कार्यवाही केली आहे.

(२) क्षेत्रीय कार्यालयाव्दारे डाटा ऐन्ट्री एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. क्षेत्रीय कार्यालयांनी झालेले काम प्रमाणित करुन कामाची देयके अदा केली आहेत. प्रसंगी विहीत मुदतीत काम न करणाऱ्या डाटा एन्ट्री एजन्सी वर दंडाची कार्यवाही केली गेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## "ब्लु व्हेल" व्हिडिओ गेमपासून मुलांना परावृत्त करण्याबाबत

**(४१) १२२८४० (२३-०७-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळांमध्ये "ब्लु व्हेल" या जीवघेण्या व्हिडिओ गेमपासून मुलांना लांब ठेवण्यासाठी सल्लागार समिती नेमण्याच्या सूचना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांनी सर्व शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकाऱ्यांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सूचनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१२-०९-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सर्व शिक्षा अभियांनातर्गत नविन पाठयपुस्तक वितरित केल्यावर जुनी पाठयपुस्तके रद्दीत विक्री केल्याबाबत

**(४२) १२२८४७ (२३-०७-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्व शिक्षा अभियानांतर्गत दरवर्षी कोटयवधी विद्यार्थ्यांना नविन पाठयपुस्तक वितरित केल्यावर जुनी पाठयपुस्तके रद्दीत विक्री करण्यात आल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सहयोगी प्राध्यपकांची झालेली नियमबाहय नेमणूक

**(४३) १२४२०३ (२३-०७-२०१८). श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात कार्यरत असलेले डॉ.अशोक पवार, हे सहयोगी प्राध्यापकासाठी खोटी कागदपत्रे सादर करुन प्रोफेसर झाले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ.पवार यांचेविरुध्द एमफील व पीएचडी धारक विदयार्थ्यांनी कुलगुरुंकडे तक्रारी केल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विद्यापीठाने १ सदस्यीय समिती गठीत केली असून त्यानुसार विद्यापीठ स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात नळपाणी पुरवठा होत नसल्याबाबत

**(४४) १२४५५२ (२५-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात कोट्यवधी रुपये खर्च करुन नळपाणी पुरवठा योजना राबवूनही प्रत्यक्षात नागरिकांना पाणी पुरवठा होत नसल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर तालुक्यात नळपाणी पुरवठा योजना पुर्ण होऊनही नागरिकांना पाणी पुरवठा न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) मुरबाड तालुक्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मागील १० वर्षामध्ये राबविण्यात आलेल्या १७६ नळ पाणी पुरवठा योजनांपैकी ११२ योजनांमधून पाणी पुरवठा सुरु आहे. सदर योजनांवर रु.३९.६१ कोटी खर्च झाला आहे. रखडलेल्या योजनांमधील भ्रष्टाचाराच्या तक्रारींमुळे विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्यामार्फत ठाणे जिल्ह्यातील सन २००५-०६ पासून घेण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांची माहे, डिसेंबर, २०१५ अखेर चौकशी करुन अहवाल सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार मुरबाड तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| एकूण मंजूर योजना | पुर्ण झालेल्या व पाणी पुरवठा सुरु असलेल्या योजना | प्रगती-पथावरील योजना | अपहारीत योजना | | समितीने रक्कम परत करणे आवश्यक असलेल्या योजना | रद्द करण्यात आलेल्या योजना |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | गुन्हे दाखल करावयाच्या योजना | गुन्हे दाखल केलेल्या योजना | | |
| १७६ | ११२ | ३० | ०० | २८ | ०० | ०६ |

अपहारीत रक्कम वसूल करण्याच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्यात आलेल्या २८ योजनांपैकी अपहारीत पूर्ण रकमेचा भरणा करण्यात आलेल्या ४ योजना व अपहारीत रकमेचे काम काम पूर्ण केलेली १ योजना व अज्ञात आरोपी असलेली १ योजना वगळून उर्वरीत २२ योजनांमध्ये समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्या ७/१२ वर बोजा चढविण्याचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. ७/१२ बोजाबाबत तहसिल कार्यालयाकडून कारवाई सुरु आहे.

तसेच दिनांक ०९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने रखडलेल्या योजनांचे मूल्यांकन करुन अंतिम टप्प्यात असलेल्या योजना आहे त्या स्थितीत पूर्ण करण्याच्या व कामे पूर्ण होणे शक्य नसलेल्या योजना ताब्यात घेऊन जिल्हा परिषदेमार्फत पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना तालुकास्तरावर देण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

पूर्ण झालेल्या सर्व पाणी पुरवठा योजनांमधून पाणी पुरवठा सुरु आहे.

---

### शालेय क्रीडा स्पर्धांमधून ४३ खेळ वगळल्याबाबत

**(४५) १२४९९९ (२०-०७-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या क्रीडा विभागाने क्रीडापटू आणि क्रीडा संघटनांना कोणतीही कल्पना न देता शालेय क्रीडा स्पर्धांमधून ४३ खेळ वगळण्यात आल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रीडा क्षेत्राला पुढे आणण्यासाठी "खेलो इंडिया "चा नारा देवून खेळाला प्राध्यान्य देण्याचा शासनाचा प्रयत्न चालू असताना ४३ खेळांना क्रीडा स्पर्धांमधून वगळण्याचा निर्णय घेण्याचे कारण काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार वगळलेल्या खेळांचा पुन्हा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०९-२०१८) :** (१) (२) व (३) नाही.

सन २०१७-१८ मध्ये शालेय क्रीडा स्पर्धेतील आयोजनास मान्यता दिलेल्या ४३ क्रीडा प्रकारांच्या आयोजनासह; सन २०१६-१७ मधील शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनामधून स्थगिती दिलेल्या खेळ प्रकारांपैकी ज्यांचा समावेश ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा, एशियन क्रीडा स्पर्धा व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा यासारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये आहे. त्या क्रीडा प्रकारांसह, राज्यात प्रचलित असलेल्या काही क्रीडा प्रकाराचे आयोजन करण्याबाबत दि. २७ ऑगस्ट, २०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना निर्देशित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कायम विनाअनुदानित शाळांच्या मुल्यांकनासाठीच्या निकषांमध्ये बदल करण्याचा घेतलेला निर्णय

**(४६) १२५००५ (२३-०७-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विनाअनुदानित शाळांच्या मुल्यांकनासाठीच्या निकषांमध्ये बदल करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व या निर्णयास शिक्षक व मुख्याध्यापक संघटनेने विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१८) :** (१) मुल्यांकनासंदर्भातील शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ मधील अ.क्र.१० व ११ मध्ये शासन निर्णय, दिनांक ३० मे, २०१८ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. उर्वरीत निकष जशाच्या तसे आहेत.

(२) व (३) या बाबतचे निवेदन प्राप्त झाले आहेत. तथापि, सदर सुधारणा जाचक नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चलपतगुडा व गडचांदूर (जि.चंद्रपूर) येथील पाणीटंचाईबाबत

**(४७) १२५०४८ (२५-०७-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा शेडवाही (ता.जिवती, जि.चंद्रपूर) ग्रामपंचायत अंतर्गत येणा-या चलपतगुडा येथे लाखो रुपये खर्च करुन खोदण्यात आलेल्या बोअरवेलला पाणी नसल्याने पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच औद्योगिक शहर गडचांदूर (जि.चंद्रपूर) शहरात माहे एप्रिल, २०१८ मध्ये तीव्र पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बोअरवेलना पाणी न लागण्याची कारणे काय आहेत तसेच मौजा शेडवाही व गडचांदूर येथील पाणी टंचाई दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-०९-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

चलपतगुडयाची लोकसंख्या ४१ असून हया ठिकाणी १ सौरऊर्जा आधारित दुहेरीपंप व १ हातपंप अस्तित्वात आहे. २०१७ च्या पावसाळयात जिल्हयात पर्जन्यमान कमी झाल्याने एप्रिल, २०१८ मध्ये पाण्याची पातळी खोल गेली होती, परिणामी हातपंपाला पाणी कमी येत असल्याने चलपतगुडा येथे काही प्रमाणात पाणी टंचाई जाणवली होती.

(२) हे खरे आहे.

(३) शेडवाही ग्राम पंचायत असलेल्या भू-भागातील गावठाण कठीण चुनखडयाने व्यापलेला असून हा खडक भूजल उपलब्धतेच्या दृष्टीने अयोग्य ठरविण्यात आला आहे. तसेच दगडामध्ये चिरा, भेगा तथा विघटनाचे प्रमाण कमी असल्याने पाण्याची उपलब्धता साधारण दिसून येत असल्यामुळे बोअरवेलला पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही.

शेडवाही ग्राम पंचायत अंतर्गत चलपतगुडा येथे ग्राम पंचायत कडून हातपंपाच्या पाईपची लांबी वाढविण्यात आली असल्यामुळे हातपंपास पुरेसे पाणी उपलब्ध झाले आहे.

तसेच पाणी टंचाई सन २०१८ अंतर्गत गडचांदूर शहरासाठी नगर पंचायत तर्फे टंचाई आराखडा तयार करुन शहरातील नागरिकांना दररोज ४ टँकरव्दारे ३५ ते ४० खेपा करुन पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्हयातील महाविद्यालयांच्या गैरकारभारामुळे इनस्पायर शिष्यवृत्ती देण्यास होत असलेला विलंब

**(४८) १२५५२८ (२३-०७-२०१८). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनातर्फे ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या व विज्ञान शाखेत पदवीस प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांना इनस्पायर शिष्यवृत्ती देण्यात येते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्हयातील विदयार्थ्यांना महाविदयालयाच्या गैरकारभारामुळे इनस्पायर शिष्यवृत्ती मिळण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार ज्या महाविद्यालयांच्या गैरकारभारामुळे इनस्पायर शिष्यवृत्ती मिळण्यास विलंब झाला आहे त्या महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे. केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडून इनस्पायर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज मागविण्यात येतात. सदर शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालयाकडून राबविली जात नाही.

(२) तक्रारी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कायम विनाअनुदान तत्त्वावर स्थापन झालेल्या मराठी शाळांना अनुदान मिळण्यास शासनाने मूल्यांकन निकष लागू केल्याबाबत**

**(४९) १२५५५१ (२३-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००१ पासून कायम विनाअनुदान तत्त्वावर स्थापन झालेल्या मराठी शाळांना अनुदान मिळण्यास मूल्यांकन निकष लागू करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुदान निकषात ९ वी व १० वी मध्ये सलग ३ वर्षे १०० टक्के निकाल लागणे अपेक्षित आहे नाहीतर अनुदान कपात होऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थी निहाय निकष बदलणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मूल्यांकन निकष रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) नाही.

इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गाचा निकाल सलग तीन वर्षातून किमान एक वर्षी १०० टक्के असावा, अशी तरतूद आहे. शैक्षणिक गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने सदर तरतूदीचा समावेश करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला (जि.अकोला) येथील शासकीय धान्य गोदामातील धान्याचा अपहार केल्याबाबत**

**(५०) १२६२९८ (२३-०७-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) येथील शासकीय धान्य गोदामातील धान्य वाटपासाठी दिनांक १० व ११ डिसेंबर, २०१४ रोजी एकाच पासिंगचा वापर करून ९५.५० क्विंटल गव्हाचा अपहार केल्याची कबुली गोदाम व्यवस्थापकाने तत्कालीन जिल्हाधिकारी यांचेकडे दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपहार प्रकरणी गोदाम व्यवस्थापकास रुपये १ लाख ९९ हजार १६० रुपयाची रक्कम तीन दिवसाचे आत शासन भरणा करण्याचे आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपहार प्रकरणी गोदाम व्यवस्थापकावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) जिल्हा लेखा पर्यवेक्षक यांच्या शासकीय धान्य गोदाम, अकोला येथील लेखा तपासणीमध्ये गोदाम व्यवस्थापक, अकोला यांनी दि.१०.१२.२०१४ रोजी रास्तभाव दुकानदारांना प्राधिकारपत्राद्वारे वाटप केलेले ९५.५० क्विंटल धान्याचे (प्राधान्य गट गहु) पुन्हा दि.११.१२.२०१४ रोजी वाटप दर्शविल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी संबंधिताकडुन अपहाराच्या दिनांकापासुन व्याजासह एकुण रु.२,६७,८८५/- इतकी रक्कम वसुल केली आहे.

संबंधित गोदाम व्यवस्थापकाविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम १० अन्वये कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.